पुढारी | बुधवार २६ ऑगस्ट २०१५

# कलातपस्वी आबालाल रेहमान यांच्यामुळेच कलाक्षेत्रास वेगळी उंची कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन

## आबालाल रेहमान आर्ट गॅलरी उद्घाटन

कोल्हापूर : प्रतिनिधी

कलातपस्वी आबालाल रेहमान यांनी कलाकृतीतून केवळ रंगरेषाच नव्हे, तर शरीरशास्त्राचा अभ्यास, तत्कालीन सामाजिक, आर्थिक स्थिती मांडणी केली. राजर्षी शाहू महाराजांसारख्या पारखी जोहऱ्यामुळेच कोल्हापूरला रेहमान यांच्यासारखा हिरा मिळाला. कलानगरीला वेगळी उंची मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले. याची कृतज्ञ जाणीव सर्वांनी ठेवायला हवी, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.



**कोल्हापूर : विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन विस्तारित इमारतीत कलातपस्वी आबालाल रेहमान कला दालनाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, श्यामकांत जाधव, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. डी. आर. मोरे, अजेय दळवी.**

रंगबहार संस्थेच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन विस्तारित इमारतीत कलातपस्वी आबालाल रेहमान कला दालन उभारण्यात आले आहे. या कलादालनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ चित्रकार श्यामकांत जाधव होते. रंगबहारतर्फे विद्यापीठास समकालीन चित्रकारांच्या कुंचल्यातून साकारलेली दीडशे चित्रे प्रदान करण्यात आली आहेत. पहिल्या टप्प्यात ५६ चित्रे कलादालनात लावण्यात आली आहेत. कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालनाची उभारणी करण्यास शिवाजी विद्यापीठाने दिलेले सहकार्य ही महान कलाकाराला वाहिलेली आदरांजली आहे, अशी भावना कुलगुरू डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, मराठा इतिहास संशोधन केंद्रातर्फे कोल्हापूरच्या पंचखंडात्मक इतिहास लेखनाचे कार्य हाती घेण्यात आले आहे. कोल्हापूरच्या कला, सांस्कृतिक बाजूंवर प्रकाशझोत टाकणारा एक स्वतंत्र खंड निर्माण करण्याची योजना आहे. त्यामध्ये आबालाल रेहमान, बाबूराव पेंटर यांच्यासह अनेक महान कलातपस्वींच्या कार्याचा सविस्तर समावेश करण्यात येणार आहे.

अध्यक्षीय भाषणात श्यामकांत जाधव यांनी आबालाल रेहमान यांच्या कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले, आबालाल रेहमान यांच्या कलागुणांची पारख राजर्षी शाहू यांनी केली. दरबारात त्यांना स्थान दिल्याने ते वीस हजारांहून अधिक उत्तम कलाकृती निर्माण करू शकले. एका पिढीचे काम एकट्याने उभे केले आहे. राजर्षींच्या निधनानंतर त्यांनी दोन बोटी भरून कलाकृती पंचगंगेला अर्पण केल्या. मोजक्या उपलब्ध कलाकृतींतून त्यांच्या महान कार्याची प्रचिती येते. त्यांचे कार्य भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

या प्रसंगी रंगबहारचे अध्यक्ष प्राचार्य अजेय दळवी यांनी स्वागत- प्रास्ताविक केले. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी आभार मानले. विजय टिपुगडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. डी. आर. मोरे, महेश काकडे, वित्त व एन.व्ही. कोंगळे यांच्यासह विजयमाला मेस्त्री, धनंजय जाधव, अमृत पाटील, रियाझ शेख, सर्जेराव निगवेकर, राजाभाऊ उपळेकर, प्रवीण वाघमारे, शैलेश राऊत, राहुल रेपे, विलास बकरे, अभिजित कांबळे, किशोर पुरेकर, श्रीकांत डिग्रज[illegible] संजीव संकपाळ, अतुल डाके, व्ही.बी. पाटील, निर्मला कुलकर्णी, उज्ज्वल दिवाण, प्रेमला भोसले, रमेश बीडकर, मंगेश शिंदे, सुरेश पोतदार, वैशाली पाटील, सुनील पोवार आदी उपस्थित होते.